# अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबटच्या पिल्लाचा मृत्यू

## चांदुररेल्वे वनपरीक्षेत्रातील कारला ते चिरोडी मार्गावरिल घटना | वर्षभरात बिबट मृत्यूमुखी पडल्याच्या तीन घटना



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.7 )-** पोहरा-मालखेड राखीव जंगलाच्या चांदुर रेल्वे वन परीक्षेत्राअंतर्गत चिरोडी गावाजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्याच्या पिल्लाचा मृत्यू झाला. ही घटना 7 डिसेंबर रोजी सकाळी चिरोडी ते कारला मार्गावर उघडकीस आली. पिल्लाची आई आजु-बाजुच्या परिसरात असल्याने नागरिकांनी गर्दी करू नये, असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे. जंगलातील मार्गावर रस्ता ओलांडताना वन्यप्राण्यांचे मृत्यू होत आहे. वर्षभरात रस्ता अपघात तीन बिबट मृत्युमुखी पडल्याची माहिती आहे.

शनिवारी सकाळी काही नागरिकांना चिरोडी ते कारला मार्गालगत बिबटचे पिल्लु मृतावस्थेत आढळून आले. नागरिकांनी याबाबतची माहिती वनविभागाला दिली. त्यानंतर वन विभागाचे पथक सकाळी सात वाजता चिरोडी कारला मार्गावर असणाऱ्या घटनास्थळी पोहोचले. वनकर्मचार्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यानंतर पशु वैद्यकीय अधिकार्यामार्फत बिबटच्या पिल्लाचे शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर मृत बिबट्याला अंत्यसंस्कारासाठी वडाळी येथील बांबू उद्यान परिसरात नेण्यात आले होते. बिबट व त्याचे पिल्लु रस्ता ओलांडत असताना, पिल्लु मागे राहिले आणि त्याचवेळी बिबटचे पिल्लु रस्त्यावर आले. दरम्यान भरधाव वाहनाची धडक बिबटला लागली असावी, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### मृतदेहाला मादी बिबटनेच केले बाजूला

रात्रीच्या अंधारात अज्ञात वाहनानं दिलेल्या धडकेमुळे बिबट्याचे पिल्लू रस्त्याच्या मधातच मृत अवस्थेत पडून होते. पहाटे या पिल्लाच्या आईने मृत पिल्लाला रस्त्याच्या कडेला आणून ठेवल्याचे या परिसरातील ग्रामस्थांनी सांगितले. शनिवारी पहाटे चिरोडी आणि कारला येथील ग्रामस्थांची घटनास्थळी गर्दी झाली असता घटनास्थळावरुन मृत बिबट्याची आई जंगलात पळाली.

### वाहने हळू चालविण्याचे आवाहन

अमरावती शहरालगत असणाऱ्या पोहरा, मालखेड, चिरोडी या समृद्ध जंगल परिसरात गत अनेक वर्षांपासून बिबट्यांचा वावर आहे. या जंगलात बिबट्यांची संख्या अधिक असून, इतर वन्य प्राण्यांनी हे जंगल समृद्ध आहे. या जंगलातील मार्गावर ठिकठिकाणी नागरिकांना सावधपणे वाहन चालविण्याचे सूचना फलक लावणे आवश्यक आहे. रात्रीच्या वेळी या भागातून जाताना नागरिकांनी देखील आपल्या वाहनाची गती मर्यादित ठेवणं गरजेचे आहे. या भागातील वन्य प्राण्यांसंदर्भात जनजागृतीची खऱ्या अर्थानं गरज आहे, असे राज्य वन्यजीव मंडळाचे माजी सदस्य यादव तरटे यांनी सांगितले.

# मी सौ.सुलभा संजय खोडके!


## तिसऱ्यांदा घेतली महाराष्ट्र विधानसभा सदस्यत्वाची शपथ



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.7 )-** राज्यात फडणवीस-शिंदे-अजित पवार यांच्या नेतृत्वातील महायुतीचे सरकार स्थापन होताच आता वर्ष 2024 -2029 पर्यंतच्या पंधराव्या महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आलेल्या नवनिर्वाचित आमदारांना पद व गोपनीयतेची शपथ देण्याला घेऊन महाराष्ट्र विधानसभा-डिसेंबर 2024 चे दोन दिवसीय विशेष अधिवेशन आजपासून बोलाविण्यात आले आहे. विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या 288 जागांवर निवडून आलेल्या आमदारांना विधानसभा सदस्यत्वाची शपथ दिली. ज्यामध्ये 38, अमरावती विधानसभा मतदार संघातून दुसऱ्यांदा निवडून आलेल्या महायुती-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नवनिर्वाचित आमदार सुलभा संजय खोडके यांनी आपल्या महाराष्ट्र विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेऊन कार्यभाराला सुरुवात केली आहे. आ.खोडके या तिसऱ्यांदा आमदार झाल्या आहे. त्यामूळे वास्तवात त्यांनी तिसऱ्यांदा शपथ घेतली. यावेळी सभागृहातील उपस्थित सर्व आमदारांनी त्यांचे स्वागत व अभिनंदन केले. याप्रसंगी सभागृहात राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार आदींसह महाराष्ट्र विधानसभेचे नवनिर्वाचित सदस्य उपस्थित होते.

सांगण्यात येते की, अमरावती जिल्ह्याचा समाजकारण,राजकारण ,सहकार व महिला चळवळीत अग्रणी असलेल्या आमदार सुलभा खोडके या तिसऱ्यांदा महाराष्ट्र विधानसभेवर पोहोचल्या आहे. मागील वर्ष 2019 ते 2024 च्या विधानसभेच्या पंचवार्षिक काळामध्ये आमदार सुलभा खोडके यांनी सर्वाधिक 341 प्रश्न उपस्थित करून विदर्भातील सर्वाधिक प्रश्न उपस्थित करणाऱ्या आमदार म्हणून लौकिक मिळविला आहे. आता महायुती सरकारच्या काळात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या आमदार म्हणून त्यांनी नव्या कार्यकाळाला सुरुवात केली असल्याने अमरावती विधानसभा मतदार संघामध्ये उत्साह व आनंद व्यक्त होत आहे.

### प्रताप अडसडांनी संस्कृतमध्ये घेतली शपथ



जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे मतदारसंघात सलग दुसऱ्यांदा निवडून आलेले प्रताप अडसड यांनीही सदस्य व गोपनियतेची शपथ घेतली. विशेष म्हणजे अडसडांनी संस्कृतमध्ये शपथ घेवून अनेकांना आश्चर्याचा धक्का दिला.

# गांजा तस्करीत दोघांना अटक

## 26 किलो गांजा जप्त



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.7 ) -** गांजा तस्करी करणाऱ्या दोघांना शहर गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पथकाने गाडगेनगर हद्दीतील पंचवटी चौकातून 6 डिसेंबर रोजी अटक केली. शेखर संजय गडलींग (27, रा. निळकंठ शाळेजवळ, महाजनपुरा अमरावती) व सुनिल सुधाकर वानखडे (39,रा. अडगाव, ता. मोर्शी, जि. अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून 26. 145 कि.ग्रॅ. वजनाचा गांजा माल व इतर साहित्य असा एकुण 5 लाख 32 हजार 900 रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 चे अधिकारी व अंमलदार 6 डिसेंबर रोजी सायंकाळी गाडगेनगर हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना गुप्त माहिती मिळाली की, शेखर गडलींग नावाचा इसम हा त्याच्या साथीदारासह पंचवटी चौकातील डॉ. पंजाबराव देशमूख हॉस्पीटलजवळ गांजा बाळगून विक्रीसाठी येत आहे. या माहितीवरून तत्काळ पोलिसांनी पंचवटी चौकातील डॉ. पंजाबराव देशमूख हॉस्पीटल जवळ सापळा रचला. दरम्यान पोलिसांना दोन इसम आपल्या हातात दोन मोठया बॅग घेवून येत असल्याचे दिसले. त्यामुळे पोलिसांनी त्यांना घेराव घालून त्यांच्या बॅगची तपासणी केली. त्यावेळी आरोपी शेखर संजय गडलींग व सुनिल सुधाकर वानखडे यांच्याजवळील बॅकेत 26.145 कि.ग्रॅ. गांजामाल व इतर साहित्य जप्त केले. याप्रकरणात आरोपीविरूध्द गाडगेनगर पोलिस ठाण्यात एन.डी.पी.एस. ॲक्टप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, कल्पना बारवकर, सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, अरूण पाटील, पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक मनिष वाकोडे, योगेश इंगळे, अनिकेत कासार, पोलिस हवालदार फिरोज खान, सतिश देशमूख, अजय मिश्रा, पोलीस अंमलदार नाझीमोददीन सैयद, विकास गुडधे, संग्राम भोजने, सुरज चव्हाण, निखील गेडाम, योगेश पवार, उमेश बानुबाकोडे, किशोर खेंगरे, रोशन माहुरे यांनी केली आहे.

### फलोत्पादन अभियानात शेतकऱ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती -** एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना लाभ देण्यात येणार आहे. यासाठी मोहीम स्वरूपात अर्ज मागविण्यात आले आहे.

# तरूणीचा विनयभंग करणारा ऑटोचालक गजाआड

## अचलपूर पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपुर,( दि.7 ) -** आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या तरुणीला मार्गात गाठून ऑटो चालकाने तिचा विनयभंग केल्याची घटना समोर आली आहे. अचलपूरमध्ये बडा इमामबारा परिसरात ही घटना घडली. आरोपी ऑटोचालक तलवार शाह उर्फ मोहम्मद जाहिद मोहम्मद बशीर याने तरूणीसोबत गैरवर्तन केले. त्यामुळे तरुणीच्या तक्रारीवरून अचलपूर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरूणी रोज सकाळी पायी आपल्या कामाच्या ठिकाणी जात असते. नेहमी प्रमाणे ती जात असतांना घटनेच्या दिवशी आरोपी ऑटो चालकाने मागून येऊन तिला थांबवले आणि तुझ्या भावाला पोलिसांनी अटक केली आहे, असे सांगून त्याने आधी तिला घाबरवण्याचा प्रयत्न केला आणि यादरम्यानच त्याने असभ्य वर्तन करून विनयभंग केला.

### तरुणीच्या अपहरणाचाही प्रयत्न

याआधीही आरोपीने दोनदा मुलीला ऑटोमध्ये बसवून अपहरण करण्याचा प्रयत्न केला होता. मी तुला नेऊन सोडतो,असे तो म्हणाला होता.मात्र त्यावेळी पिडीत तरूणीने दुर्लक्ष केले. परिणामी ऑटोचालकाची हिम्मत वाढली आणि त्याने पुन्हा एकदा तरूणीला मार्गात गाठून तिचा विनयभंग केला. दरम्यान या प्रकारामुळे घाबरलेल्या तरुणीने तत्काळ अचलपूर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. अचलपूर पोलिसांनी आरोपी ऑटो चालक तलवार शाह उर्फ मोहम्मद जाहिद मोहम्मद बशीर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. या प्रकरणाचा तपास पोलीस ठाण्याचे प्रभारी ठाणेदार गजानन मेहेत्रे यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे.

# भरदिवसा घरफोडीप्रकरणी चोरटा अटकेत

## 60 हजार रुपये किमंतीचे सोन्याचे दागिने जप्त



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.7 )-** शहर आयुक्तालयातील नागपुरीगेट येथे दिवसा झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्यात पोलिसांनी एका आरोपीला अटक केली. जब्बार खान रउफ खान (27, रा. अन्सारनगर वाडी, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून 9.950 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले असून, पुढील कार्यवाहीकरीता आरोपीला नागपुरीगेट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

अमरावती शहरात गेल्या काही दिवसापासून चोरीच्या घटना वाढल्या आहेत. अशातच नागपुरी गेट हद्दीत दिवसा चोरीचे प्रयत्न व चोरीच्या घटना घडल्याचे निदर्शनात आले होते. या अनुषंगाने पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी सदर गुन्हे उघडकीस आणण्याच्या सुचना केल्या होत्या. यानुसार गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पथकाने समांतर तपास करून हा गुन्हा उघडकीस आणला आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, कल्पना बारवकर, सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वाखाली एपीआय मनिष वाकोडे, पोलिस हवालदार फिरोज खान, सतिश देशमूख, पोलीस अंमलदार नाझीमोददीन सैयद, विकास गुडधे, सुरज चव्हाण, निखील यांनी केली.

### नागपुरी गेट हद्दीतील गुन्हा उघड

नागपुरीगेट पोलीस ठाण्यात रूस्तम शाह मुनिर शाह (55, रा. जिशान नगर न. 1, अमरावती) यांनी 3 डिसेंबर रोजी तक्रार दिली होती. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरु केला होता. सदर गुन्ह्याचा समांतर तपास करीत असतांना माहीतीवरून तसेच तांत्रीक पध्दतीने तपास केला. दरम्यान सदरचा गुन्हा रेकॉर्डवरील आरोपी जब्बार खान रउफ खान याने केल्याचे निष्पन्न झाले. या माहितीवरून पोलिसांनी त्याला पंचवटी चौक येथून ताब्यात घेतले. त्याच्याकडून गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त केला. आरोपीला नागपुरीगेट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.


# मोबाईलवर स्टेटस टाकल्याने तणाव

- डेअरी चालकाच्या दुकानाची तोडफोड
- तळेगाव मोहना येथील घटना, पोलिस बंदोबस्त

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.7 )-** तालुक्यातील तळेगाव मोहना येथे शुक्रवारी सायंकाळी साडेसात वाजता मोबाईलवर वादग्रस्त स्टेटस टाकल्याने दोन समाजात तणाव निर्माण झाला. हे स्टेटस न हटवल्यामुळे एका समाजातील काही लोकांनी डेअरी चालकाच्या मालाची तोडफोड केल्याने गावात तणाव वाढला. यावेळी परिस्थिती पाहता तळेगावात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. अचलपूर शहरातील सरमसपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरमसपुरा पोलीस स्टेशन हद्दीतील डेअरी संचालक यांनी शौर्य दिनानिमित्त त्यांच्या मोबाईलवर स्टेटस टाकले होते. इतर समाजातील काही लोकांनी यावर आक्षेप घेत हे स्टेटस काढून टाकण्याची मागणी केली. या मुद्द्यावरून हाणामारी झाली. त्यानंतर दोन्ही समाजाचे लोक समोरासमोर आले. त्यामुळे तणाव आणखी वाढला. घटनेची माहिती मिळताच सरमसपुरा पोलिस ठाण्याचे प्रभारी आपल्या पथकासह घटनास्थळी पोहोचले. त्यांनी लोकांना शांत केले आणि गावात सुरक्षेसाठी पोलिस बंदोबस्त तैनात केला. अतिरिक्त पोलिस बंदोबस्तही मागवण्यात आला आहे. पोलिस या प्रकरणाचा तपास करत असून, परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहेत.

# जुन्या वाहनांनाही आता हाय सिक्युरिटी नंबरप्लेटची सक्ती

## तीन एजन्सीला काम | 31 मार्च 2025 पर्यंत `एचएसआरपी' लावणे अनिवार्य



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती( दि.7 )-** गुन्हा करण्यासाठी वाहनांचा होणारा वापर रोखण्यासाठी व नंबरप्लेटच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी नव्या वाहनांना 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट' (एचएसआरपी) लागू करण्यात आली. आता जुन्या वाहनांनासुद्धा 'एचएसआरपी' ची सक्ती केली जाणार आहे. त्यासाठी परिवहन विभागाने तीन एजन्सीची नियुक्ती केली असून शुल्कही निर्धारित केले आहे.

राज्यात 2019 पासून नव्या उत्पादित वाहनांना 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट' सक्तीची केली आहे. वाहनाला एकदा ही नंबरप्लेट लावल्यानंतर ती पुन्हा काढता येत नाही. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने बनविण्यात आलेली ही नंबरप्लेट्स 'टॅम्परप्रुफ' असते. या नंबरप्लेटवर निळ्या रंगाच्या चक्राचे होलोग्राम व वाहन क्रमांकाच्या काळ्या तिरप्या ओळीत 'इंडिया' (इंग्रजीतील शब्द) अक्षरे लिहिलेली असतात. ही नंबरप्लेट ॲल्युमिनिअम मिश्र धातूपासून बनवलेली असते. परिवहन विभागाने 31 मार्च 2025 पर्यंत जुन्या वाहनांना 'एचएसआरपी' लावणे अनिवार्य केले आहे.

### डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून सुरू होणार

आरटीओ तज्ज्ञानुसार, जुन्या वाहनांना 'एचएसआरपी' बसविण्याचे काम तीन एजन्सीला देण्यात आले आहे. ही एजन्सी त्या-त्या आरटीओ कार्यालयांतर्गत येणाऱ्या क्षेत्रात आपले फ्रेंचायझी सुरू करून वाहनांना नंबरप्लेट लावण्याचे काम करणार आहे. तूर्तास याची सुरुवात झालेली नाही; परंतु डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यापासून सुरू होण्याची शक्यता आहे.

### असे असणार शुल्क

| | |
|---|---|
| वाहनाचा प्रकार | - 450 रुपये |
| दुचाकी व ट्रॅक्टर | - 500 रुपये |
| तीनचाकी कार व इतर वाहने | - 745 रुपये |

### झोन 1 मधील जुन्या वाहनांची जबाबदारी रोस्मर्टा सेफ्टी सिस्टमकडे

झोन 1 मधील जुन्या वाहनांसाठी नंबरप्लेट तयार करणे व लावण्याची जबाबदारी रोस्मर्टासाठी सेफ्टी सिस्टम लिमिटेड या एजन्सीला देण्यात आली. यात %एमएच 47, एमच 04, एमएच 46, एमएच 09, एमएच 12, एमएच 26, एमएच 27, एमएच 37, एमएच 29, एमएच 49, एमएच 31, एमएच 51 या आरटीओ कोडमधील जुन्या वाहनांचा समावेश असेल.


### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, नारायणराव जर्नाधनपंत धांडे, रा. परतवाडा जि. अमरावती येथील रहीवाशी आहेत. त्यांच्या मुलाच्या जन्माची नोंद नगरपरिषद अंजनगाव सुर्जी येथे रजिस्टरमध्ये जन्माची नोंद नसल्याने त्यांनी जन्म / मृत्यु अधिनियम 1969 चे कलम 13 (3) अन्वये जन्माच्या नोंदीचे आदेश होण्याबाबतचा विनंती अर्ज या कार्यालयात दि. 9/11/2024 रोजी सादर केला आहे.

त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरून जाहीरनामा प्रसिध्द करण्यात येत आहे अमोल नारायणराव धांडे रा. सुर्जी अंजनगाव सुर्जी यांचा जन्म अंजनगाव सुर्जी येथे दि. 12/05/1978 रोजी झाला आहे. त्याबाबत कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार असल्यास किंवा प्रकरणात काही म्हणावयाचे असल्यास त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून 30 दिवसाचे आत स्वत: अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत अन्यथा 30 दिवसानंतर जर कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

कोर्ट शिक्का

**रविंद्र काळे**
**निवासी नायब तहसिलदार,**
**अंजनगाव सुर्जी**


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# लालपरी च्या उत्पन्नात अमरावती विभाग तिसऱ्यावर

## प्रतिदिवस 66 लाख 13 हजारांचे उद्दिष्ट केले पुर्ण

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 7) -** राज्य परिवहन रस्ते महामंडळाच्या अमरावती विभागाने नोव्हेंबर महिन्याच्या 1 ते 30 नोव्हेंबर या कालावधीत प्रतिदिवस 66 लाख 13 हजारांचे उद्दिष्ट पुर्ण करित, राज्यात तिसरा क्रमांक पटकाविला आहे.

यामध्ये प्रथम क्रमांकावर रत्नागिरी विभाग, तर द्वितीय क्रमांकावर परभणी विभाग असून अमरावती विभागात राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसमध्ये महिलांना अर्ध्या तिकीट दरात प्रवास करण्याची सवलत दिली आहे.



याशिवाय 65 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठीही अर्ध्या तिकीट दरात प्रवासाची सवलत असून, 75 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध आहे. या योजनांचा एसटीला चांगला फायदा होत आहे. परिणामी, एसटीच्या प्रवासी भारमानात चांगली वाढ झाली आहे. दिवाळी सुटीत तर 14 नोव्हेंबरपर्यंत प्रवाशांची गर्दी मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे प्रवाशांनी भरभरून लालपरी धावत होत्या. अमरावती विभागानेही या सुटीच्या कालावधीत जादा बस सोडल्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळाला होता. याशिवाय प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन गर्दीच्या मार्गावरील अतिरिक्त फेऱ्या वाढवल्या होत्या. पुणे, नागपूर व जिल्हांतर्गत मार्गावरील जादा गाड्या सोडण्यात आल्या होत्या. एकूणच एसटी महामंडळाच्या अमरावती विभागाने केलेल्या नियोजनामुळे एसटी महामंडळाच्या तिजोरीत भर पडली आहे.

> एसटी महामंडळातील चालक, वाहक आणि अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे यश प्रवाशांची गर्दी पाहून त्या-त्या मार्गावर फेऱ्यांची संख्या वाढविण्यात आली होती. विभागातील सर्व चालक-वाहक, कर्मचारी, अधिकारी यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे उद्दिष्टपूर्ती होऊ शकली आहे.
>
> **नीलेश बेलसरे, विभाग नियंत्रक, अमरावती**



# खण्डेला धाम भारत जागरण रथ यात्रेचे 10 डिसेंबर ला शहरागमण

## शहरातील गायत्री मंदीरात पार पडली नियोजन बैठक

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.7 )-** खंडेलवाल समाजाचे कुळ दैवत असलेल्या खण्डेला धाम राजस्थान येथुन निघालेल्या भारत जागरण रथ यात्रेच्या स्वागतार्थ वरूड शहरात तय्यारी करण्याकरीता शहरातील गायत्री मंदीर येथे वरुड तालुक्यातील समाज बांधवांची बैठक नुकतीच पार पडली.

खंडेलवाल वैश्य समाजाचे उगम स्थान असलेल्या खण्डेला जि. सीकर (राजस्थान) मध्ये बनलेल्या खंडेलवाल वैश्य समाजाच्या तिर्थक्षेत्र येथुन भारत भ्रमणाकरीता निघालेली खण्डेला धाम भारत जागरण रथ यात्रा गुजरात राज्यानंतर महाराष्ट्रात प्रवेश करून सहाडा, नंदुरबार, धुळे, सिल्लोड, खामगाव, सोनाला, अकोला, अमरावती, अचलपुर, परतवाडा मार्गे 10 डिसेंबर रोज मंगळवारला संत्रानगरी वरूड शहरात पोहचणार आहे. खंडेलवाल समाजात खण्डेला धाम प्रती जनजागृती करण्याकरीता मॅनेजिंग ट्रस्टी पुरुषोत्तम गुप्ता यांचे नेतृत्वात संपूर्ण देशभरात भ्रमण करणार आहे. या खण्डेला धाम भारत जागरण यात्रेचा रथ महाराष्ट्रातील मोजक्याच शहरातुन मार्ग भ्रमण करीत असतांना समाजबांधव या रथ यात्रेचे भव्य स्वागत करीत आहे. या करीता वरूड, पुसला आणि शेंदुरजनाघाट येथील सर्वच खंडेलवाल समाज बांधवांनी 10 डिसेंबर रोज मंगळवारला सकाळी 10 वाजता सहपरिवार शहरातील केदारचौक येथे उपस्थित राहुन भारत जागरण रथ यात्रेत सहभागी होऊन आप आपल्या कुळ दैवताच्या दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन वरूड तालुका खंडेलवाल समाजाच्या वतिने एका प्रसिद्धी पत्रकाव्दारे करण्यात आले आहे.




# ठाणेदारांच्या कार्याचा नागरिकांकडून सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, (दि.7) -** अधिकाऱ्यांच्या बाबतीत चांगल्या कार्याची दखल नेहमीच अंजनगाव सुर्जी येथील नागरिक घेत असतात. पुन्हा एकदा येथील ठाणेदारांचा सत्कार घेवून हे नागरिकांनी दाखवून दिले.

अंजनगाव सुर्जी चे पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रकाश अहिरे यांनी गणेश उत्सव, दुर्गा उत्सव, तसेच धार्मिक उत्सव आणि संपूर्ण लोकसभा विधानसभा निवडणूक हे सर्व प्रमुख कार्यक्रम नागरिकांची मदत घेऊन अतिशय शांततेत पार पाडले. स्थानिक शहराचा अभ्यास करून संवेदन स्थळ असो की महत्त्वाचे पॉईंट या ठिकाणी गणेशोत्सव, दुर्गा उत्सव मिरवणुकी दरम्यान प्रार्थना स्थळाकडे जाणाऱ्या मार्गावर लाकडी कठळे लावून प्रथमच त्या मार्गाच्या मुख्य ठिकाणी कापडी परदे लावले होते. त्याचप्रमाणे मिरवणुकीच्या दिवशी वीज मंडळावर अवलंबून न राहता कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने मुख्य चौका चौकात लाईटचे फोकस आणि जनरेटर ठेवण्यात आले होते. ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनात शहरातील कायदा व व्यवस्था स्थानिक ठाणेदार प्रकाश अहिरे यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने सांभाळल्याने त्यांच्या कार्याची येथील शांतताप्रिय नागरिकांनी घेऊन आज दिनांक 7 डिसेंबर रोजी ठाणेदार प्रकाश अहिरे यांचा सत्कार पोलीस स्टेशन कार्यालयात नागरिकांच्या वतीने करण्यात आला. येथील मानवता वादी क्रांती दलाचे अध्यक्ष शफिनियाजी, माजी नगरसेवक हारून अली, आबिद मेंबर, मं. इद्रिस कुरेशी, मं. सादिक बिल्डर, अशोक पिंजरकर, रमेश भाऊ पायघन, कुशाल चौधरी, सागर ताडे यांनी ठाणेदारांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार केला. यांप्रसंगी मानवतावादी क्रांती दलाचे अध्यक्ष शफिनियाजी यांनी मिरवणुकी दरम्यान काही संवेदनशील प्रसंग ठाणेदारांनी समय सूचकता ठेवून कसे हाताळले त्याबद्दल माहिती दिली. याप्रसंगी अनेक नागरिक उपस्थित होते.



शहरातील शांतता व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांच्या महत्त्वपूर्ण सूचनाची नेहमीच मी दखल घेत असतो नागरिकांच्या सहकार्यातूनच पोलीस चांगले कार्य करू शकत असतात त्याकरिता नागरिकांची मदत पोलिसांना आवश्यक असते असे सत्कार प्रसंगी ठाणेदार प्रकाश अहिरे यांनी सांगितले.

महिला पोलीस कर्मचारी यांच्यासह शाळांना भेटी देऊन शाळा कॉलेजमधील मुलींची सुसंवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेणार असल्याचे ठाणेदारांनी या प्रसंगी बोलताना सांगितले.

# स्वयंपाकी उमेश रमेश नाईक यांनी हजर होण्याचे आदेश

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि. 7 ) -** जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, अमरावती यांचे अधिनस्त अधिक्षक शासकीय मुलांचे अनुरक्षणगृह, वरिष्ठ बालगृह, अमरावती संस्थेत स्वयंपाकी पदावर उमेश रमेश नाईक हे काम करीत होते. उमेश रमेश नाईक यांनी स्वयंपाकी पदावर कार्यरत असताना कर्तव्यात कसूर केल्याबाबत त्यांच्यावर दोषारोप लावण्यात आले आहे. त्यानुसार त्यांना हजर होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

उमेश रमेश नाईक स्वयंपाकी यांनी म्हणणे मांडणे कामी त्यांचेकडे असलेल्या आवश्यक पुरावे, कागदपत्रासह त्यांना दि. 29 ऑक्टोबर, दि. 6 नोव्हेंबर, दि. 14 नोव्हेंबर, व दि. 28 नोव्हेंबर 2024 रोजी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, महिला व बाल विकास भवन, राणी दुर्गवती चौक, कॅम्प रोड, अमरावती येथे हजर राहण्यासाठी कळविण्यात आले आहे. परंतू उपरोक्त दिनांकास ते गैरहजर राहिले आहेत. त्यामुळे त्यांचे म्हणणे या कार्यालयासमोर आलेले नाही. त्यांचे म्हणणे मांडणे कामी असलेल्या आवश्यक पुरावे, कागदपत्रासह आठ दिवसाचे आत न चुकता हजर राहावे. ही अंतिम संधी देण्यात येत आहे. सदर कालावधीत म्हणणे आवश्यक कागदपत्र व पुराव्यासह हजर न झाल्यास आपले काहीही म्हणणे नाही असे गृहित धरून श्री नाईक यांच्या प्रकरणावर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. याची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी कळविले आहे.

महिला व बाल विकास विभाग

# आकांक्षित विकास तालुक्यात चिखलदरा राज्यात द्वितीय

## केंद्र शासनाच्या 2024-25 या वर्षातील पाहिल्या 'डेल्टा रैंकिंग' मध्ये पटकाविले दुसरे स्थान

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.7 ) -** विकासाच्या बाबतीत अतिमागास तालुक्यांचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या नीती आयोगाने संपूर्ण भारतात 500 आकांक्षित तालुके घोषित केले आहे. नीती आयोगाची मुख्य उद्दिष्ट शाश्वत विकास असून मागास तालुक्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे आहे. विशेष निर्देशांक आरोग्य व पोषण, शिक्षण, कृषी, संलग्न सेवा, सामाजिक विकास आणि मूलभूत पायाभूत सुविधा या प्रमुख पाच थीमवर नीती आयोग कार्य करत आहे. यात महाराष्ट्रातील 27 तालुक्यांचा समावेश असून, त्यात अमरावती जिल्ह्यातील मेळघाट म्हणुन ओळख असणाऱ्या चिखलदरा आणि धारणी या दोन तालुक्यांचा सामावेश करण्यात आला आहे. वर्ष 2024-25 वर्षातील प्रथम डेल्टा रँकिंग मध्ये चिखलदरा तालुका विकासाच्या बाबतीत राज्यात द्वितीय क्रमांकावर आहे.केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत आंतरमंत्रालयीन समितीने 27 राज्ये आणि 4 केंद्रशासित प्रदेशांतून 500 तालुक्यांची निवड केली आहे. मेळघाटातील चिखलदरा तालुक्याने विकासाच्या बाबतीत राज्यातील 27 तालुक्यांमूधन द्वितीय क्रमांक, पश्चिम विभागातील 69 तालुक्यांमधून 2 रा क्रमांक, तर संपूर्ण भारतातील 500 तालुक्यांमधून चिखलदरा तालुक्याने 28 वा क्रमांक पटकावला आहे. तर महाराष्ट्र मध्ये 27 तालुक्यांमधूनही द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. तसेच धारणी 139 क्रमांकावर आहे.



तसेच हा डेल्टा रँकिंगमध्ये राज्यातून पहिल्या क्रमांकावर कारंजा वर्धा, दुसऱ्या क्रमांकावर चिखलदरा अमरावती, तिसऱ्या क्रमांकावर तळोदा नंदुरबार, चौथ्या क्रमांकावर किनवट नांदेड आणि पाचव्या क्रमांकावर नवापूर नंदुरबार ने स्थान पटकावंले आहे. केंद्र सरकारच्या नीती आयोगाकडून प्राप्त झालेल्या एकुण 40 निर्देशंकांपैकी चिखलदरा तालुक्यात 40 निर्देशांक 100 टक्के साध्य करणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

# समाजाची सेवा करण्याचा वारसा हा वडिलांकडूनच - माधवराव देशपांडे


## पांढरघाटी येथे सातपुडा हाफ मॅरेथॉन स्पर्धेचा समारोप



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.7 )-** मी जरी आज नागपूर येथे राहत असलो तरी माझा जन्म हा पांढरघाटी येथे झालेला आहे. माझे वडील स्वर्गीय वामनराव देशपांडे हे जवळपास 60 ते 65 वर्षांपर्यंत पांढरघाटी येथेच राहिलेले आहे. त्यांनी सांगितले होते की, तू कितीही मोठा झाला तरी आपल्या जन्मगावाला विसरू नकोस, असे प्रतिपादन माधवराव देशपांडे यांनी केले. ते सातपुडा हाफ मॅरेथॉन स्पर्धेच्या समारोपीय कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणातून व्यासपीठावरून बोलत होते.

या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून निळकंठ मुरूमकर हे होते तर विशेष अतिथी म्हणून बेनोडा शहीद पोलीस स्टेशनचे ठाणेदार ज्ञानोबा फड तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे माजी सदस्य श्रीधर सोलव, खडका ग्रामपंचायतचे सरपंच राहुल फुले, गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे, सामाजिक कार्यकर्ता उत्तम शेरेकर, रयत क्रांती संघटनेचे विदर्भ प्रमुख ?ड.आशिष वानखडे, पत्रकार विलास पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी दिलीप बुरंगे, दशरथ गाडगे, शालेय पोषण आहाराचे अधीक्षक अनिल चहांदे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष सुधाकर कुबडे, खडका ग्रामपंचायतच्या सदस्य फुलाबाई सलामे हे आवर्जून उपस्थित होते.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक सुधीर कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षक विजय घोरपडे यांनी तर आभार नामदेव सानप यांनी मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विजय इडपाची, जगदीश परतेती, संदीप परतेती,रितेश कुबडे, अनिल युवनाते, मुकेश धुर्वे, सुखदेव कोडापे, अनिल आहाके, श्यामराव अमोदे, उषा धुर्वे, माला आहाके, बेबी कंगाले, उषा कंगाले, कल्याणी भोंडे, खुशी अमोदे यांनी केले. तर पोलीस विभागातील अधिकारी-कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी डॉ. मानसी पाटील व कर्मचारीवृंद, नरेंद्र पाटील, मनीष दिघेकर, चंदन आडे, जगदीश चंदेल, राम पांडे, प्रवीण वसुले, राम बंदे, आशा चहांदे, ऑफिशिअल टीम ओम कास्देकर ,विक्कीसिंग अंधेरेले, आकाश पाटील, नरेंद्र बालपांडे, नितेश अंबाडकर, गोकुल पांडे, स्वयंम हीवसे यांचे विशेष सहकार्य लाभले.

देशपांडे पुढे म्हणाले की, वडिलांचा वारसा चालवत असताना मी माझ्या मुलांना सुद्धा पांढरघाटी विषयी जिव्हाळा आणि आपुलकी ठेवून गावाविषयी काय करता येईल ते करण्याचा प्रयत्न त्याने करावा असेही ते यावेळी म्हणाले.

### या भागातील विद्यार्थी ऑलम्पिक मध्ये हवा-गटशिक्षणाधिकारी

आयोजकांनी सातपुडा हाफ मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चालना मिळावी यासाठी ही स्पर्धा माझ्या दृष्टिकोनातून एक अविस्मरणीय आहे. या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आपल्या माध्यमातून जे काही करता येईल ते करण्याचा प्रयत्न मी गटशिक्षणाधिकारी म्हणून करण्याचा प्रयत्न करेल. एवढेच नाही तर अशा उपक्रमातून चांगले विद्यार्थी तयार होऊन ऑलिंपिक मध्ये सुद्धा खेळल्या गेले पाहिजे. यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे मत वरुड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विजय गाढे यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

### बक्षिसे प्राप्त स्पर्धक

मुलांमधून 11000रु प्रथम क्रमांक -पियुष मसाने, वरुड, 7000रु. द्वितीय क्रमांक -प्रज्वल हरले, धनोडी, 5000 रु तृतीय क्रमांक -साजन डोंगरे, वरुड, 1101 रु प्रोत्साहनपर बक्षीस रुग्वेद चोबितकर यांना मिळाले. तसेच 1000 रु. प्रोत्साहनपर -पराग हजारे, खडका तर मुलींमधून 5000 रु प्रथम - प्रतीक्षा धुर्वे, वरुड , 3000 रु द्वितीय -आचल पवणे, जरुड, 2000 रु तृतीय - साक्षी नेवारे, 1501 रु प्रोत्साहनपर -नंदिनी खवसे, लोहद्रा जि प पू माध्य. शाळा, शहापूर -1000 रु प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले.

# भविष्यातील निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात

## मोर्शी शहर काँग्रेस कमिटीची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि.7) -** भविष्यातील सर्व प्रकारच्या निवडणुका ईव्हीएम मशीन ऐवजी बॅलेट पेपर वर घेण्यात याव्यात, या मागणी करिता मोर्शी शहर काँग्रेस कमेटी तर्फे स्थानिक जयस्तंभ चौक येथे स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. या अभियानास नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मशीन द्वारा मतदान घेण्यात आले. परंतु या निवडणुकीत झालेले मतदान व आकडेवारी यांच्यात प्रचंड तफावत दिसुन आल्याने राज्यातील महाविकास आघाडीच्या व अनेक पक्षाच्या पराभुत उमेदवारांनी आपआपल्या मतदारसंघात फेरमतमोजणीची मागणी निवडणूक आयोगाकडे केलेली होती. स्वत: उमेदवारांना देखील एवढ्या प्रचंड मताधिक्याने निवडून येण्याची शास्वती नव्हती. तसेच अनेक दिग्गज नेते थोड्याथोड्या फरकाने विधानसभा निवडणुकीत पराभुत झाल्याचे पहायला मिळाले.




एकंदरीत हा सर्व प्रकार संशयास्पद असुन येणाऱ्या काळात होऊ घातलेल्या सर्व निवडणुका या ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात, अशी मागणी जिल्हा काँग्रेस कमेटी चे अध्यक्ष अनिरुद्ध उर्फ बबलू देशमुख यांच्या निर्देशानुसार मोर्शी शहर काँग्रेस कमेटी चे अध्यक्ष भुषण कोकाटे यांचे नेतृत्वात जयस्तंभ चौक मोर्शी येथे स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. याप्रसंगी राजेंद्र लाखोडे, प्रकाश काळे, रविंद्र विरुळकर, धनंजय पांडव इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते. स्वाक्षरी मोहिमेत अनेक नागरिकांनी स्वाक्षरी करून केलेल्या मागणीला दुजोरा देत असल्याचे सांगुन प्रचंड प्रतिसाद दिला.